**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ए.जी.हळींगळे,
गुरु अपार्टमेंट, जयहिंद कॉलनीजवळ,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त , सांगली-मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली
(२) **अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी
(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहा आयुक्त सांगली-मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली
(२) **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (इ.व द.), जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८+१९ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ए.डी.हळींगळे, गुरु अपार्टमेंट, जयहिंद कॉलनीजवळ, विश्रामबाग, सांगली ४१६४१५.

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त , सांगली-मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.बाजीराव जाधव

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री.रविंद्र शिंदे

(१)**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी सहा आयुक्त सांगली-मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.शिवाजी तुकाराम रसाळे

(२)**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (इ.व द.), जिल्हा परिषद, सांगली श्री.आर.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.१.२००६ (अ.क्र.१९/सांगली)<br>दि. १९/१०/२००५(अ.क्र.१८/सांगली) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.२.२००६(अ.क्र.१९/सांगली)<br>दि. १०/११/२००५(अ.क्र.१८/सांगली) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.२.२००६(अ.क्र.१९/सांगली)<br>दि. १/२/२००६ (अ.क्र.१८/सांगली) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.४.२००६(अ.क्र.१९/सांगली)<br>दि. २८/२/२००६(अ.क्र.१८/सांगली) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**
**अपील क्र.१९/सांगली**

१.ग्रामीण मार्ग ३३ पैकी कुपवाड ते कॉलेज हा ३.२० किमी व गव्हर्नमेंट कॉलनी ते कॉलेज हा ३.२०किमी हा रस्ता कागदोपत्री दिसतो. हाच मार्ग २००० साली पुर्नविलोनातही ६.४०किमी. दिसतो प्रत्यक्षात त्याची लांबी दर्शविणारा सर्वे नंबर असलेला कुपवाडचा नकाशा मिळावा, तसेच ग्रामीण मार्ग ३३ ची प्रत्यक्ष लांबी किती आहे.

२. योजनाबाह्य रस्ते योजनेत येऊन प्लॅन्ड झालेले असल्यास शासनाच्या मंजूरीची प्रत, तसेच कुपवाड स.नं.१३४/१ मधून जाणारा ग्रामीण मार्ग ३३ व गव्हर्नमेंट कॉलनीची सीमा दर्शविणारा नकाशा.

३.कार्यकारी अभियंता(इ व द)जि.प.सांगली यांचेकडील उपकार्यकारी अभियंता यांची १.४.१९९२ ते ३१.१२.२००५ या कालावधीतील यादी .

४.कार्यकारी अभियंता यांचेकडील पत्र क्र.४२९०-दि.२३.७.१९९९, ६४०३-दि.२६.११.१९९९, ४८१४-दि.२१.८.१९९९,२७६-दि.१५.१.१९९९,५३८५-दि.८.१०.१९९८,६१२० दि.२१.१०.१९९९, ६४५५-दि.३०.११.१९९९ व ४४९९-दि.५.८.१९९९ वर कोणत्या अधिकाऱ्याची सही आहे. तसेच या अधिकाऱ्याना तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदर पत्रावर सही करुन उत्तरे पाठविण्यास अधिकार दिले होते काय.

५.करारनामा क्र.ब-१/३७ सन १९९२-९३ साली ग्रामीण मार्ग ३३ चे विशेष दुरुस्तीखाली ६०० मी.लांबीचा खडीकरणाचा जो रस्ता केला आहे तो दर्शविणारा नकाशा.

६.करारनामा क्र.ब-१/९७ सन १९९६-९७ साली ७५०मी.लांबीच्या रस्त्याचे ग्रामीण मार्ग ३३ च्या विशेष दुरुस्तीखाली डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेने केले आहे. सर्व्हेनंबर असलेल्या कुपवाडच्या नकाशात ७५० मी लांबीचा रस्ता व गव्हर्नमेंट कॉलनीची सीमा दर्शविणारा नकाशा, वरील करारनाम्यचे अंतिम देयक कोणत्या मोजमाप पुस्तकात व पृष्ठ क्रमांकावर, कोणत्या तारखेस लिहिले आहे, कोणत्या चेक क्रमांकाने किती रकमचे कोणत्या तारखेस पेमेंट अदा केले.

७.कार्यकारी अभियंता यांनी ग्रामीण मार्ग-३३ च्या विशेष दुरुस्तीसाठी कुपवाड स.नं.१३४/१ मध्ये १० मी.रुंदीचा पूर्व-पश्चिम रसता सन १९९२-९३ मध्ये केला त्याची कायदेशीर नोंद आहे काय, असल्यास त्याची प्रत. रस्त्याची कायदेशीर मागणी कार्यकारी अभियंता यांचेकडे आहे काय, असल्यास रस्त्याखालचे क्षेत्र जमीन मालकाकडे नाही काय याची माहिती.

## अपील क्र.१८/सांगली

१.दि.२५.१.१९९४ च्या हमीपत्रावरील सरपंचाचे नांव व २७.७.१९९५ च्या पत्रावरील ग्रामविस्तार अधिकारी यांचे नांव देणेत यावे.
२.ज्या रस्त्यासाठी त्यांनी हमीपत्रे दिली आहेत, ती ग्रामपंचायत बैठक घेऊन ठराव पास करुन दिली आहेत काय
३.ज्या रस्त्यासाठी हमीपत्रे देण्यात आली आहेत ते रस्ते हमीपत्राच्या दिनांकाच्यावेळी ताब्यात होते काय, काम पूर्ण झालेनंतर देखभाल दुरुस्ती व परिरक्षणासाठी परत रस्ते ग्रामपंचायतीला हस्तांतर केले आहेत काय, असल्यास हस्तांतराच्या कागदपत्रांच्या प्रती.
४. हमीपत्रे देण्याबाबत शासनाकडील ग्रामविकास खात्याकडून सरपंच किंवा ग्रामसेवक / ग्रामविस्तार अधिकारी यांना अधिकार दिले आहेत काय, असल्यास त्या परिपत्रकाची प्रत.

# विवेचन

## अपील क्र.१९/सांगली

उपरोक्त रस्त्याच्या अनुषंगानेच श्री.हळींगळे यांनी जिल्हा परिषदेने केलेल्या ग्रामीण मार्गाबाबतची माहिती कार्यकारी अभियंता (इ.व द.), जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्व मुद्दयांची माहिती विहित मुदतीत दिली. परंतु खोटी माहिती दिल्याचे कारण नमूद करुन श्री.हळींगळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले. त्यांनी श्री.हळींगळे यांचे अपील निकाली काढले, त्याविरुध्द श्री.हळींगळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

रस्ता एकच असून कोठपर्यंत गेला याची माहिती दिली आहे व आवश्यकता असल्यास पुन्हा अधिक तपशीलवार देता येईल असे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री.रविंद्र शिंदे यांनी सांगितले. परंतु आपण नकाशाची मागणी केली असून तो मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन श्री.हळींगळे यांनी केले. संबंधित जमीन श्री.हळींगळे यांची होती. ती बिगरशेती करुन न घेता अनधिकृतपणे त्यांनी ती विकली व विकसित केली, लोकांच्या मागणीनुसार त्यांनी रस्ते केले. आता त्याच रस्त्यांच्या जमिनीची नुकसानभरपाई मिळविण्याचा प्रयत्न

ते करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.एस.पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री.रविंद्र शिंदे यांनी सांगितले. आपली मागणी न्याय्य असून त्यासाठी आपण मागितलेली माहिती आपल्याला मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन श्री.हळींगळे यांनी केले.

'माहिती खोटी आहे', 'दिशाभूल केली जात आहे', 'हे मला मान्य नाही ' अशा स्वरुपाची श्री.हळींगळे यांची विधाने आहेत, मात्र ते सिध्द करणारे पुरावे ते देऊ शकलेले नाहीत. तसेच माहितीपेक्षा त्यांची मुख्य मागणी ही रस्त्याच्या जागेच्या नुकसानभरपाईची आहे, हे विविध कागदपत्रांवरुन व उभय बाजूंच्या निवेदनांवरुन स्पष्ट होते. अशा प्रकारची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

**अपील क्र.१८/सांगली**

कुपवाड ग्रामपंचायतीने सन १९९४-९५ मध्ये केलेल्या रस्ते देखभाल, दुरुस्ती आदिबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.आपासाहेब गुरुबसप्पा हळिंगळे यांनी मागितली होती. केंद्रिय माहितीचा अधिकारी अस्तित्वात आला असतानाही हा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकारी २००२ नुसार केला गेला असल्यामुळे नव्या कायद्यानुसार अर्ज करावा अशी जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.हळिंगळे यांना कळवले. असा अर्ज न करता श्री.हळिंगळे यांनी स्मरणपत्रिका ठेवली व केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अन्वये अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. कुपवाड ग्रामपंचायतीकडील जुन्या कागदपत्रांची माहिती महानगरपालिकेकडे नसल्याने महानगरपालिका ती देऊ शकत नाही हा जन माहिती अधिकाऱ्यांचा मुद्दा मान्य करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.हळिंगळे यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.हळिंगळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती व तीही विलंबाने दिली जात असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर शास्तीची व इतर कार्यवाही करावी अशी मागणी अपीलकर्ता यांनी अपिलात केली आहे.

रस्त्याच्या संदर्भातील कुपवाड ग्रामपंचायतीच्या अभिलेखाची मागणी श्री.हळिंगळे विविध अर्जाद्वारे व माहितीच्या अधिकारातही अर्ज करुन सातत्याने मागत आले आहेत. मुळात कुपवाड ग्रामपंचायत होती. सन १९९२-९३ साली तत्कालीन ग्रामपंचायतीने रस्ता केलेला आहे. ऑगस्ट

१९९५ मध्ये तेथे नगरपरिषद झाली व फेब्रुवारी १९९८ मध्ये ती सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेत विलीन झाली. ग्रामपंचायतीच्या संदर्भातील अभिलेख महानगरपालिकेकडे आढळून येत नाहीत असे श्री.हळिंगळे यांनी वारंवार स्पष्ट केले आहे, तसेच उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करुन त्यांनी स्वत: त्याबाबत खात्री करुन घेतलेली आहे असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांनी नमूद केले. आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्याशी संबंधित असून त्यांच्याकडून ही माहिती मागण्यास सांगणे म्हणजे दिशाभूल आहे. तसेच मिरज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी कुपवाड ग्रामपंचायतीची सर्व कागदपत्रे नगरपरिषद झाली तेव्हाच हस्तांतरीत करण्यात आल्याचे कळवले आहे. म्हणून मागितलेली माहिती आपल्याला महानगरपालिकेकडून मिळाली पाहिजे असे प्रतिपादन श्री.हळिंगळे यांनी केले.

श्री.हळिंगळे यांची मूळ मागणी रस्त्याच्या जागेच्या नुकसान भरपाईची आहे. त्याबाबत गुंठेवारी प्रस्ताव दाखल करण्यास त्यांना सांगण्यात आले असून तसा प्रस्ताव त्यांनी दिला आहे असे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड महानगरपालिका यांनी नमूद केले. नुकसानभरपाईची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही व त्याबाबतची कार्यवाही हा प्रशासकीय भाग आहे. श्री.हळिंगळे या कामासाठी विविध खात्यांकडे अर्ज व अपील करुन त्याच त्याच स्वरुपाची माहिती मागत असल्याचे यापूर्वीही आयोगाने नमूद केले आहे. तसेच संबंधित अभिलेखाचे अवलोकन नि:शुल्क करु देण्याचा आदेशही आयोगाने यापूर्वी दिला असून त्यानुसार अभिलेख त्यांना दाखविण्यात आले आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपीले अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

**पुणे.**
**दि.३०/१/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण महादेव आपटे
रा.२७३, प्रताप सहकारी संस्था,
सहकारनगर क्र.२, पुणे ४११००९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह पोलीस आयुक्त,
पुणे शहर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१० / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळकृष्ण महादेव आपटे
रा.२७३, प्रताप सहकारी संस्था,
सहकारनगर क्र.२, पुणे ४११००९

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर
श्री.रविंद्र सेनगावकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.८.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>खडक पोलीस स्टेशनमध्ये नोंदलेल्या तक्रार क्र.सीआर/१८३/९८ च्या आजच्या स्थितीबाबत सविस्तर माहिती. |

## विवेचन

'एशिया पॅसिफिक इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि., हैदराबाद' (पूर्वीचा 'नागार्जुन ट्रस्ट लि., हैदराबाद') या संस्थेकडील गुंतवणुकीच्या संदर्भात पोलिसांकडे नोंदविलेल्या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाही विषयीची माहिती अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण महादेव आपटे यांनी मागितली होती. गुन्ह्याचा तपास चालू असल्याच्या कारणावरुन ही माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे शहर यांनी श्री.आपटे यांना कळविले. हे कारण योग्य नसल्याचा आक्षेप घेऊन श्री.आपटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्याकडे अपील केले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.आपटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहिती नाकारण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेले कारण योग्य नसून मागितलेली माहिती मिळावी, व आपल्याला झालेल्या मनःस्तापाबद्दल नुकसानभरपाई व अपिलाचा खर्च मिळावा, अशी मागणी श्री.आपटे यांनी अपिलात केली आहे.

फिल्ड मार्शल जनरल सॅम माणेकशा हे 'एशिया पॅसिफिक इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि., हैदराबाद' (पूर्वीचा 'नागार्जुन ट्रस्ट लि.,हैदराबाद') या संस्थेचे अध्यक्ष होते. 'देशाचे रक्षण केले, तसेच मी तुमच्या गुंतवणुकीचेही रक्षण करीन, तुम्ही निश्चिंत रहा,' असे जन. माणेकशा यांनी जाहीरपणे सांगितले होते. त्यांच्या शब्दावर विश्वासून शेकडो नागरिकांनी या ट्रस्टमध्ये गुंतवणूक केली. पुण्यात एक हजारच्या आसपास ठेवीदारांनी सुमारे ६ कोटी रुपये गुंतवणूक या ट्रस्टमध्ये केली.

ट्रस्टने नंतर दिवाळे जाहीर केले. त्यानंतर जन. माणेकशा यांच्याशी संपर्क साधला असता आपण आधीच या ट्रस्टच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे असंख्य ठेवीदारांची आयुष्यभराची कमाई बुडाली व त्यांना आर्थिक ताण सहन करावा लागला, अशी पार्श्वभूमी श्री.आपटे यांनी लेखी व तोंडी विषद केली. आपले स्नेही श्री.प्र.सी.पुराणीक यांनी दि.४.८.१९९५ रोजी या ट्रस्टमध्ये ५०००/- रुपये गुंतवले होते. दोन वर्षांची मुदत संपल्यानंतर पैसे परत मागितले असता मुद्दल व व्याज यातील काहीच मिळाले नाही. आज त्यांचे वय ९० वर्षे असून पैशाची गरज असताना त्यांना ते मिळू शकले नाहीत. त्यांच्या वतीने आपण हा प्रश्न मांडत आहोत, असे श्री.आपटे यांनी सांगितले. श्री.पुराणीक यांचे वय ९० वर्षे, तर त्यांच्या वतीने विषय मांडत असलेले श्री.आपटे यांचे वय ८१ वर्षे आहे.

श्री.पुराणीक यांनी आपल्या आर्थिक फसवणुकीबाबत दि.१८.९.१९९८ रोजी पुण्यातील खडक पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. (इतरही अनेक ठेवीदारांनी गुंतवणूकदार संघटनेच्या माध्यमातून अशा प्रकारच्या तक्रारी पोलिसांकडे नोंदविल्याचे श्री.आपटे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.) श्री.पुराणीक व अन्य ठेवीदारांनी गेल्या दहा वर्षांत पोलिसांकडे हेलपाटे मारुन वारंवार विचारणा करुनही या तक्रारीच्या कार्यवाहीबाबत त्यांना कोणतीही माहिती दिली गेली नाही. त्या तक्रारीबाबत पुढे कोणती कारवाई झाली, आरोपी कोण आहेत, त्यांच्यावर खटले दाखल केले का, इत्यादी माहिती श्री.आपटे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे शहर यांच्याकडे दि.२५.५.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली. 'गुन्ह्याचा तपास चालू असल्याने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८(१)(एच) अन्वये माहिती देता येत नाही ' असे जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.९.६.२००६ रोजी कळविले. गुन्हेगारांचा तपास लावणे, त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटले दाखल करणे या प्रक्रियेत अडथळा येईल अशी माहिती पुरविण्याचे बंधन असणार नाही, अशी तरतूद कलम ८(१)(एच)मध्ये आहे. आपण मागितलेली माहिती देण्याने असा कोणताही अडथळा येत नाही, असा श्री.आपटे यांचा दावा आहे. त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्याकडे केलेल्या अपिलात ते नमूद केले आहे. तत्कालीन

अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.प्रभात रंजन यांनी 'गुन्हा दाखल असून तो सध्या तपासावर असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेला नकार योग्य' असल्याचे नमूद करुन अपील निकाली काढले. 'गुन्ह्याचे तपासाच्या प्रगतीबाबत असमाधानी असल्यास आपण तपासी अंमलदार अर्थात सहा.पोलिस आयुक्त, गुन्हे-२ किंवा त्यांचे पर्यवेक्षक अधिकारी म्हणजे पोलिस उप आयुक्त, गुन्हे अगर अपर पोलिस आयुक्त, गुन्हे यांचे कार्यालयात दाद मागून आपण आपल्या शंकेचे निरसन करुन घेऊ शकता असे सूचना वजा मार्गदर्शन करण्यात आले,' असे दि.२८.८.२००६ रोजी श्री.प्रभात रंजन यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेले कारण पूर्णत: बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याचे मत श्री.आपटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात नोंदविले आहे. संबंधित तक्रारीबाबत पोलीस खात्याने कोणतीही कार्यवाही तत्परतेने केलेली नाही, हे जनतेपुढे येऊ नये म्हणून तपास चालू असल्याच्या सबबीखाली माहिती नाकारली जात आहे, असे प्रतिपादन श्री.आपटे यांनी केले. अपीलकर्त्याला 'सूचनावजा मागदर्शन' मिळाले, परंतु दहा वर्षांपूर्वी केलेल्या तक्रारीबाबतची स्थिती काय आहे, याबाबतची माहिती मात्र मिळाली नाही.

तपास आज कोणत्या अवस्थेत आहे, अशी विचारणा आयोगाने केली असता, संबंधित प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र न्यायालयात पाठविण्याची औपचारिकता पूर्ण होण्याच्या टप्प्यात आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस उपआयुक्त, पुणे शहर श्री.रविंद्र सेनगावकर यांनी सांगितले.

वस्तुत: श्री.आपटे यांनी माहिती मागितलेल्या मुद्दयांपैकी काही अंशी मुद्दा क्र.२ चा अपवाद वगळता व मुद्दा क्र.७ व ९ भाष्य अपेक्षित करणारे असल्यामुळे ते वगळता अन्य मुद्दयांबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी देणे आवश्यक व शक्य होते. ती माहिती दिल्याने-म्हणजेच तक्रारीच्या संदर्भात केलेल्या पुढील कार्यवाहीबाबतची माहिती देण्याने तपास प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता नव्हती, हे श्री.आपटे यांचे म्हणणे रास्त आहे.

मात्र जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. त्यांची कारणमीमांसा पूर्णांशाने मान्य केलेली नसली, तरी तो अन्वयार्थाचा भाग आहे. त्यामुळे अपीलकर्त्याची शास्तीची मागणी आयोग अमान्य करीत आहे. मूळ तक्रारीबाबत कार्यवाही झाली नाही, म्हणून माहितीच्या अधिकारात नुकसानभरपाई मिळण्याची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

गुन्ह्यांच्या तपास प्रक्रियेत अडथळा येऊ नये हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ८(१)(एच) मधील तरतुदीचा उद्देश आहे. या तरतुदींचा उपयोग त्याच कारणासाठी व योग्य प्रकारे केला गेला पाहिजे. परंतु केवळ माहिती नाकारण्यासाठी ही तरतूद पोलिसांतर्फे पुढे केली जाते, असे अनेक अर्जांबाबतच्या उत्तरांवरुन दिसते. ही बाब गंभीर असून केवळ माहिती टाळण्याचा मार्ग म्हणून पोलीसांनी कलम ८(१) (एच) चा वापर करता कामा नये, याची जाणीव पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. पुणे महानगर पोलीस यंत्रणेचे प्रमुख म्हणून पोलीस आयुक्त यांनी याची दखल घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी सूचना आयोग देत आहे.

अपीलकर्त्याचे वय ८१ वर्षे व तक्रारकर्त्याचे वय ९० वर्षे आहे. त्यांनी तक्रार नोंदविल्याला जवळजवळ १० वर्षे होत आली आहेत. तक्रार नोंदवली तेव्हाही श्री.आपटे व श्री.पुराणीक ज्येष्ठ नागरिक होते. दहा - दहा वर्षे अशा नागरिकांच्या तक्रारीवर कार्यवाही पूर्ण केली जात नाही व त्याबाबतची माहितीही त्यांना दिली जात नाही, हे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ - मध्ये अपेक्षित असलेली सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता व उत्तरदायित्व यांच्याशी विसंगत आहे. दहा वर्षांनंतर न्यायालयात दोषारोपपत्र सादर होऊन न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन निकाल होण्यास अवधी लागणार, हे लक्षात घेता या नागरिकांच्या व्यथेची तड कधी लागणार व त्यांना त्याचा अपेक्षित लाभ कसा मिळणार, या प्रश्नाचा मानवी भूमिकेतून पोलीस यंत्रणेत विचार झालेला नाही, हे यातून स्पष्ट होते. महानगर पोलीस यंत्रणेचे प्रमुख म्हणून पोलीस आयुक्तांनी याची विशेषत्वाने नोंद घ्यावी, अशी सूचना आयोग करीत आहे.

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्याने मागितलेली माहिती चार दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. जन माहिती अधिकारी यांनी त्याचा पूर्तता अहवाल दि. ५.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा. या पूर्ततेची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा सह पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रविंद्र सेनगावकर यांची राहील.

(३) शास्ती व नुकसानभरपाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २४.१.२००८**

प्रत : पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. सोपान विष्णू कापसे
मु.पो. तुंग, ता. मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५ / सांगली /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सोपान विष्णू कापसे
रा.तुंग, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तहसीलदार, तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली
सौ.वैशाली चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मिरज, जि.सांगली
श्री. एम. एल. जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/६/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/७/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७/७/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/११/२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>सहाय्यक जिल्हाधिकारी, मिरज, भाग मिरज यांचा आदेश क्र.जीआयएन / तुंग- डब्ल्यूएस-१५६/८७, दि.४.३.१९८७ चे यादीतील सोबत जोडलेल्या १९ प्लॉटधारकांची नांवे गा.न.नं.७/१२ स दाखल होणेबाबत. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सोपान विष्णू कापसे, रा.मौजे तुंग, ता.मिरज, जि.सांगली व इतर १८ लोकांच्या गावठाण योजनेतील ७/१२ पत्रकी नावे दाखल का झाली नाहीत, याबाबत माहिती मागितली होती. या भूखंडधारकांनी कब्जेहक्काची रक्कम न भरल्यामुळे त्यांना कबजा दिलेला नाही व त्यांची नावे ७/१२ पत्रकी लागलेली नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मिरज यांनी श्री.कापसे यांना कळविले. हे उत्तर अमान्य असल्याचे नमूद करुन श्री.कापसे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील फेटाळल्यामुळे श्री.कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.कापसे यांनी त्यांच्या मूळ अर्जात १९ भूखंडधारकांची नावे ७/१२ ला का लागली नाहीत, एवढीच माहिती मागितली होती. कब्जेहक्काच्या रकमेची लेखी मागणी केली नसल्यामुळे भरली नाही, असे नमूद करुन श्री.कापसे यांनी ७/१२ ला नावे दाखल करण्याची मागणी प्रथम अपिलात केली. १९ भूखंडधारकांनी कब्जेहक्काची रक्कम न भरता त्यांची नावे का दाखल केली आहेत, तसेच आपण शासनाच्या सन १९८९ मधील मूल्यदर तक्त्यानुसार कब्जेहक्काची रक्कम भरण्यास तयार असून ७/१२ पत्रकी नावे लावण्यात यावीत अशी मागणी श्री.कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे.

हे प्रकरण सन १९८७ मधील आहे. कब्जेहक्काची रक्कम भरणे - न भरणे, ७/१२ पत्रकी नावे लावणे / न लावणे हा विषय प्रशासकीय कारवाईचा असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र संबंधित श्री.कापसे व इतर १८ व्यक्तींनी कब्जेहक्काची रक्कम भरली नाही, एवढेच जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तरात नमूद केले असून त्यांना रक्कम भरण्याबाबत कधीही लेखी कळविले गेलेले नव्हते, ही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद

केलेली नाही. संबंधित विषयाबाबत कार्यवाही चालू असून श्री.सोपान विष्णू कापसे व इतर १८ व्यक्तींनी कब्जेहक्काची रक्कम भरण्याबाबत एका आठवड्यात कळविले जाईल असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.एम.एल.जोशी यांनी आयोगापुढे नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.३०.१.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास पुरवून त्याबाबतचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. २३/१/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे,
रा. २१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड,
भारती विद्यापीठाजवळ, सोलापूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ५.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २२.८.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ११.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २६.९.२००६ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री. एस.एम. दावणे, निवृत्त गोदाम व्यवस्थापक यांचे निवृत्तीनंतरच्या आर्थिक लाभाविषयी पत्रव्यवहाराची व शिस्तभंगाच्या कारवाईबाबतची कागदपत्रे

# विवेचन

अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे एस.एम.दावणे, निवृत्त गोदाम व्यवस्थापक यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक लाभाविषयी व शिस्तभंग कारवाईबद्दलच्या कागदपत्रांची मागणी केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून ३० दिवसात माहिती न मिळाल्याने अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे त्यांनी अपील दाखल केले होते. त्यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री. अक्कलकोटे यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना याबाबत दि. ५.११.२००७ रोजीचे पत्रान्वये विचारणा केली असता श्री. अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी माहितीबाबत योग्य तो खुलासा केला असून आपली तक्रार राहिली नसल्याने अपील निकाली काढावे, अशी विनंती आयोगाला दि. २०.१२.२००७ रोजी सादर केलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनाही त्यांनी तसे कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचेकडूनही तसे लेखी निवेदन दि. २७.१२.२००७ रोजी आयोगास प्राप्त झाले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ११.१.२००८

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.आकाराम मारुती शिसाळ
मु.पो.ता. पलूस, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
ता. पलूस, जि. सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार, पलूस
ता. पलूस, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ११.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आकाराम मारुती शिसाळ, मु.पो.ता. पलूस, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, ता. पलूस, जि. सांगली
श्री. अरविंद बी. कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार , तहसीलदार कार्यालय,
ता. पलूस, जि. सांगली श्री. डी. एस. कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १२.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १०.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ६.१२.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>निवासी नायब तहसीलदार श्री. डी.एस.कुंभार यांच्याबाबत दि. २०.९.२००६ रोजी तक्रार दिली होती, त्यावर काय कारवाई झाली आहे याचा कृती अहवाल |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. आकाराम मारुती शिसाळ यांनी निवासी नायब तहसीलदार श्री. डी. एस. कुंभार यांच्याबाबत दि. २०.९.२००६ रोजी तक्रार दिली होती, त्यावर काय कारवाई झाली त्याबाबतच्या कृती अहवालाची माहिती मागितली होती. निवासी नायब तहसीलदार, पलूस श्री. कुंभार यांच्या बाबतच्या तक्रार अर्जावरील कारवाई बाबतच्या माहिती-मागणी अर्जाला जन माहिती अधिकारी म्हणून श्री. कुंभार यांनीच उत्तर दिले. आपण लाच मागितल्याच्या तक्रारीत कोणतेही तथ्य नसून खोडसाळपणे व पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून चारित्र्यहनन करुन कार्यक्षमतेवर परिणाम होईल असे मानसिक खच्चीकरण करणे या उद्देशाने तक्रार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते, असे श्री. कुंभार यांनी उत्तरात म्हटले आहे. तसेच 'तक्रार करणाऱ्या व्यक्तीला पुराव्याशिवाय तक्रार केल्यास अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला जातो, याबाबत समज देण्यात यावी,' असे माहिती-मागणीच्या अर्जाला दिलेल्या या उत्तरात श्री. कुंभार यांनी नमूद केले आहे. मागितलेली माहिती न मिळाल्याचे नमूद करुन श्री. शिसाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पलूस यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते अमान्य केल्यामुळे श्री. शिसाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. शिसाळ हे सामाजिक कार्यकर्ते असून निवासी नायब तहसीलदार श्री. कुंभार यांच्याविरुध्द तक्रारीची चौकशी होऊन जनजागृतीसाठी माहिती मिळणे आवश्यक होते, असे त्यांनी लेखी नमूद केले आहे. श्री. शिसाळ यांनी तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली असली तरी मूळ आरोपाचे पत्र तहसीलदारांकडे पाठविण्यात आले नसून श्री. शिसाळ यांच्याकडे पाठविण्यात आले होते. 'तक्रारअर्जाची चौकशी करता' असे जन माहिती अधिकारी म्हणून श्री. कुंभार यांनी दिलेल्या

उत्तरात म्हटले आहे, परंतु प्रत्यक्षात त्यांच्या विरुध्द तक्रार व तेच जन माहिती अधिकारी असल्यामुळे चौकशी न होताच अवाजवी भाष्य करणारे उत्तर त्यांनी दिले आहे, असे प्रतिपादन श्री. शिसाळ यांनी केले. अनधिकृत मुद्रांक विक्रेत्याला आपण तहसील कार्यालयात प्रवेश नाकारला, म्हणून आपल्या विरुध्द आरोप करणारी तक्रार संबंधितांनी केली, असे प्रतिपादन श्री. कुंभार यांनी केले. त्यांच्या उत्तराच्या पत्रावर दि. १२.१०.२००६ अशी तारीख असली तरी प्रत्यक्षात त्यानंतर तीस दिवसांनी हे पत्र पाठविले गेले, असे श्री. शिसाळ यांनी निदर्शनास आणले व पुराव्यादाखल टपालाची तारीख, शिक्का असलेला लखोटा सादर केला. तहसील कार्यालयातील जावक नोंदीही श्री. शिसाळ यांच्या प्रतिपादनाला दुजोरा देणाऱ्या आहेत. त्यातील नोंदीनुसार दि.१२.१०.२००६ अशी तारीख असलेला उत्तराचा लखोटा श्री. शिसाळ यांना दि. ९.११.२००६ रोजी पाठविण्यात आला असून दि. १०.११.२००६ रोजी मिळाला आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पलूस श्री. अरविंद कोळी यांनी माहितीच्या मूळ मागणीचा विचार करण्याऐवजी आरोपाबाबतचा लेखी पुरावा अपीलकर्त्याने सादर केलेला नाही, याचा ऊहापोह करुन 'योग्य व विहित मुदतीत माहिती दिल्याचे' म्हटले आहे. मूळ आरोपातच तथ्य नसल्याचे आढळल्यामुळे श्री. कुंभार यांनी दिलेले उत्तर योग्य आहे, असे श्री. कोळी यांनी नमूद केले.

प्रत्यक्षात चौकशी झालेली नसताना चौकशी झाल्याचे उत्तर दिले व खोटी माहिती दिली, असा दावा श्री. शिसाळ यांनी केला. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तो अमान्य केला.

एकूण कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता असे दिसते की, स्वतःवरील आरोपाबाबत जन माहिती अधिकारी म्हणून स्वतःच उत्तर देण्याची श्री. कुंभार यांची कृती औचित्यपूर्ण नाही. त्यांनी दिलेल्या उत्तरात चौकशी कोणी व कधी केली याचा स्पष्ट उल्लेख नाही. तसेच 'माहिती' च्या कक्षेबाहेरचे भाष्य व 'तक्रारकर्त्याला समज' देण्यासारखे विधान केले आहे. ती 'माहिती' नसून स्वतःवरील आरोपाबाबतचे त्यांचे मत आहे. चौकशीत तथ्य आढळले नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री. कोळी यांनी सांगितले असले तरी नेमकी चौकशी कोणी केली व निष्कर्ष काय, याची माहिती त्यांनीही स्पष्टपणे दिलेली नाही. उत्तराच्या पत्रावर नमूद केलेल्या तारखेनंतर एक

महिन्याने अपीलकर्त्याला उत्तर रवाना करण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती त्यांच्या हेतूबद्दल साशंकता निर्माण करणारी आहे.

श्री. कुंभार यांच्यावर आरोप करणारे अर्ज श्री. शिसाळ यांच्याकडे आले व श्री. शिसाळ यांनी त्या अनुषंगाने श्री. कुंभार यांच्याविरुध्द तक्रार करणारा अर्ज तहसीलदारांकडे केला. त्यावर चौकशी व कारवाई व्हावी ही श्री. शिसाळ यांची मुख्य मागणी आहे. ती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती नेमकेपणाने श्री. शिसाळ यांना दिली जाणे आवश्यक होते.

वरील बाबींचा विचार करता श्री. अरविंद कोळी यांनी श्री. कुंभार यांच्या विरुध्दच्या अर्जावरील चौकशी व कारवाई या बाबतची नेमकी माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. तक्रार अर्जावरील कार्यवाहीची नेमकी माहिती अपीलकर्त्याला तीन आठवड्यात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि. २५.१.२००८ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पलूस यांनी आयोगाला सादर करावा.

३. माहिती-मागणीच्या अर्जाला नेमके उत्तर न देता संदिग्ध व अनावश्यक भाष्य करणारे उत्तर देण्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पलूस श्री. डी.एस.कुंभार यांना समज देण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. १४ .१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक विशंबरनाथ गुप्ता,
रा. ६०, भोसलेनगर, पुणे-४११ ००७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग १, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. १ पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४१ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २१.९.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ९.११.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १८.१२.२००६ |

६ <u>**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**</u>

सह दुय्यम निबंधक हवेली क्र.१ यांच्या कार्यालयातील नोंदणी झालेला दस्त क्र. ६२३२/८४ दि. ८.९.१९८४ व दस्त क्र. ८४०९/८८ दि. २७.५.१९८८ च्या प्रमाणित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अशोक विशंबरनाथ गुप्ता यांनी सह दुय्यम निबंधक, हवेली कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्त क्र.६२३२/८४ दि. ८.९.१९८४ व दस्त क्र. ८४०९/८८ दि. २७.५.१९८८ च्या प्रमाणित प्रती मागितल्या होत्या. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. गुप्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडील अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २६.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. आपण मागणी केल्याप्रमाणे दस्ताच्या प्रमाणित प्रती आपल्याला मिळालेल्या असल्याने आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्याने सह दुय्यम निबंधक, हवेली १, पुणे यांना दि. २९.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सह दुय्यम निबंधक, हवेली १, पुणे यांनी श्री. गुप्ता यांचे निवेदन त्यांच्या दि. २९.१२.२००७ रोजीच्या पत्रासोबत आयोगाला पाठविले असून सदर अपील निकाली काढण्याबाबत विनंती केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ११.१.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे,
शिवतीर्थ विद्यानगर,जत, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण,
विभागीय कार्यालय,मुंढा, ता. कराड, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
महापारेषण, (सं व सु) विभागीय कार्यालय, मुंढा, ता. कराड,
जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, 'शिवतीर्थ', विद्यानगर , जत, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण, विभागीय कार्यालय, मुंढा, ता. कराड, जि. सातारा श्री.नामदेव ज्ञानू जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/३/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/३/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/४/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१. दि.१३.१२.२००५ रोजी ११०/३३/११ के.व्ही. उपकेंद्र संख येथे कोणत्या स्वरुपात अप्रिय घटना घडली त्याचे कारण व त्यावर पारेषण कंपनीने काय कारवाई केली.<br>२. या घटनेनंतर संख येथील ११ के.व्ही.संख, अंकलगी, भिवर्गी, आसंगी या वाहिन्या कोणत्या तारखेपासून बंद होत्या.<br>३. सदर वाहिन्या कोणत्या तारखेस व कोणत्या वेळेस पूर्ववत चालू झाल्या. तसेच कोणत्या ३३ के.व्ही.लाईन्स वरीलप्रमाणे बंद व चालू झाल्या व त्या कोणत्या कारणाने चालू झाल्या.<br>४. या कालावधीत पारेषण कंपनीचे कर्मचारी कोण कामावर हजर होते व कोण कर्मचारी कामावर हजर नव्हते, हजर नसतील तर त्याचे कारण व पारेषण कंपनीने याबाबत केलेली कारवाई. |

## विवेचन

संख, तालुका जत, जि.सांगली या गावी दि.१३.१२.२००५ रोजी झालेल्या दंगलीमुळे आजूबाजूच्या गावांमधील वीजपुरवठा दोन ते तीन दिवस बंद पडला होता. त्या अनुषंगाने, दंगलीच्या कारणापासून वाहिन्या बंद असण्याच्या कालावधीपर्यंत विविध स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.हरिभाऊ दिगंबर खापरे, सहसचिव, जत तालुका विद्युतधारक असोसिएशन यांनी मागितली होती. ती विहित मुदतीत न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.खापरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण (सं.व सु.) विभागीय कार्यालय, मुंढा, ता.कराड, जि.सांगली यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनी दखल न घेतल्यामुळे श्री.खापरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महापारेषण (सं. व सु.) विभागीय कार्यालय श्री.बी.एस.अय्यंगार यांची बदली झाली असून त्यांच्या जागी रुजू झालेले जन माहिती अधिकारी आयोगापुढील सुनावणीस उपस्थित नव्हते. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.एन.जे.पाटील हे आजारी असल्याचे उत्तरवादी यांचेतर्फे सांगण्यात आले. विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नामदेव ज्ञानू जाधव हे उपस्थित होते.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती चुकीची आहे, तसेच काही छायांकित प्रती सुवाच्य नाहीत. दि.१४.१२.२००५ ते १५.१२.२००५ या कालावधीत संख उपकेंद्रातून बाहेर पडणाऱ्या ३३ केव्ही वाहिन्या बंद होत्या, ही माहिती चुकीची आहे. या काळात वीजपुरवठा चालू असल्याचे वितरण कंपनीच्या कागदपत्रांवरुन दिसते, असे श्री.खापरे यांनी नमूद केले. दि.१६.१२.२००५ ते दि.२०.१२.२००५ या कालावधीत संख उपकेंद्रातून वीजपुरवठा प्रत्यक्षात झाला नाही या संदर्भातील जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती संदिग्ध आहे. दि.१६,१७ व १८ डिसेंबर रोजी वीजपुरवठा खंडित झाल्याचे विद्युत नियामक आयोगासमोरील सुनावणीचे वेळी दिसून आले आहे, असेही प्रतिपादन त्यांनी केले. या अनुषंगाने विविध ठिकाणी दाखल केलेल्या याचिकांमध्ये अर्जदारांना अपयश आले. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली आहे असे आपल्याला वाटते. या चुकीच्या माहितीच्या आधारे दाखल केलेल्या याचिकांमुळे झालेला खर्च व त्रास यापोटी २०,०००/- रुपये भरपाई द्यावी अशी मागणी श्री.खापरे यांनी तोंडी व लेखी निवेदनाद्वारे केली. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती योग्य आहे व लॉगशीटच्या व अन्य प्रती व अन्य कागदपत्रे यांवरुन हे स्पष्ट होते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नामदेव ज्ञानू जाधव यांनी केले.

तांत्रिक विश्लेषणानंतर मूळ माहिती योग्य असल्याचे दिसून येते, असे श्री.जाधव यांचे म्हणणे असून श्री.खापरे यांना त्याबाबतच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता असल्याचे दिसून आले. तसेच संख उपकेंद्रातील कोणत्या वाहिन्या, नेमक्या किती व कोणत्या कालावधीसाठी बंद होत्या याची माहिती नेमकेपणाने मिळावी व तांत्रिक विश्लेषणावर निष्कर्ष अवलंबून असल्याने तो स्पष्टपणे नोंदविला जावा, अशी मागणी श्री.खापरे यांनी केली, ती रास्त आहे. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीमुळे अन्य मंचांपुढील याचिकांमध्ये अपयश येऊन अपीलकर्त्यांचे नुकसान झाले. म्हणून भरपाई द्यावी, ही मागणी अवास्तव व अतिशयोक्त आहे, म्हणून ती मान्य करता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) संख पकेंद्रातील कोणत्या वाहिन्यातील नेमक्या कोणत्या व किती कालावधीसाठी बंद होत्या याचा तपशील दि.१५.९.२००७ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु त्यानुसार नेमकी माहिती मिळाली नसल्याचे श्री.खापरे यांनी दि.१७.९.२००७ रोजी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. संबंधित माहितीची त्वरित पूर्तता करुन तसा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण, विभागीय कार्यालय, मुंढा, ता.कराड यांनी दि.५.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) शास्ती अथवा नुकसानभरपाई नाही.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. २५/१/२००८